# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक २९

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **शुक्रवार दिनांक ०६/०५/२०२५ सकाळी ११-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ३. | श्री.किशोर सुडके | सहाय्यक आयुक्त |
| ४. | श्री.बाळासाहेब थत्तु | मुख्यलेखाअधिकारी |
| ५. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ६. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ७. | श्री महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ८. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता |
| ९. | श्री.राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १०. | श्री.लक्ष्मण पाटील | प्र.सहा.आरोग्याधिकारी |
| ११. | श्री चंद्रकांत जाधव | प्र. मलेरीया पर्यवेक्षक |
| १२. | श्री.अविनाश गवळी | लिपीक,आस्थापना विभाग |
| १३. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १४. | श्री एन के बागुल | उप अभियंता , विद्युत विभाग |
| १५. | श्री.प्रकाश सोनवणे | उप अभियंता, नगररचना विभाग |
| १६. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता, नगररचना विभाग |
| १७. | श्री.प्रदीप चव्हाण | उप अभियंता, बांधकाम विभाग |
| १८. | श्री.राजेंद्र माईनकर | भांडारपाल, भांडार विभाग |
| १९. | श्री मधुकर निकुंभे | वसुली विभाग |
| २०. | श्री संभाजी सुडके | लिपीक शिक्षणमंडळ |
| २१. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २२. | श्री.अनिल भडागे | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २३. | श्री.रविकिरण पाटकरी | प्र.वृक्षसमिती प्रमुख |
| २४. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |

म.नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** — आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-४४७ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये लेख्यांचा साप्ताहिक तपासणी अहवाल स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४२५दिनांक ०६/०५/२०२५**

महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५(१) अन्वये विहीत करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी दि. ३/०२/२०२५ ते दि. ७/०२/२०२५ पर्यत तसेच दि. १०/०२/२०२५ ते दि. १४/०२/२०२५ व दि. १७/०२/२०२५ ते दि. २१/०२/२०२५ पर्यंत तसेच दिनांक २४/०२/२०२५ ते दि. २८/०२/२०२५ तपासणी करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार मा. लेखा परीक्षक यांच्या मार्फत उक्त कालावधीत झालेल्या साप्ताहिक तपासणी लेख्यांचा अहवाल मे.स्थायी समिती समोर वाचून सादर करण्यांत आला.

या अहवालातील निष्कर्षानुसार लेखा परिक्षण विभागाने लेखा विभागाशी समन्वय ठेवुन याबाबतची पडताळणी करुन आवश्यक ती पूर्तता त्वरीत करण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४४८ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये लेख्यांचा साप्ताहिक तपासणी अहवाल स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४२६ दिनांक ०६/०५/२०२५**

महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५(१) अन्वये विहीत करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी दि. ३/०३/२०२५ ते दि. ७/०३/२०२५ पर्यत तसेच दि. १०/०३/२०२५ ते दि. १४/०३/२०२५ व दि. १७/०३/२०२५ ते दि. २१/०३/२०२५ पर्यंत तसेच दिनांक २४/०३/२०२५ ते दि. २८/०३/२०२५ तपासणी करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार मा. लेखा परीक्षक यांच्या मार्फत उक्त कालावधीत झालेल्या साप्ताहिक तपासणी लेख्यांचा अहवाल मे.स्थायी समिती समोर वाचून सादर करण्यांत आला.

या अहवालातील निष्कर्षानुसार लेखा परिक्षण विभागाने लेखा विभागाशी समन्वय ठेऊन याबाबतची पडताळणी करुन आवश्यक ती पूर्तता त्वरीत करण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४४९ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 चे कलम 106 (1) (अ) अन्वये अहवाल सादर करणे बाबत-महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी/कंत्राटदार यांचे कडील प्रलंबित अग्रीमाचे समायोजन बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपमुख्य लेखा परिक्षक मनपाच्या सन 2023-24 वर्षाचे जी अग्रीम नोंदवही आहे. नमुना क्रमांक १४७ ची तपासणी केली त्यामध्ये असे लक्षात येते की, सन 2023-24 चे अग्रीम नोंदवही

गोषवाऱ्यानुसार 16,04,56,825/- एवढया रक्कमेचे समायोजन होणे बाकी आहे. जे कर्मचारी सेवानिवृत्त होणार आहे. त्याकडुन हे वसुल केले जातात. पण बरेच कर्मचारी / अधिकारी/ कंत्राटदार यांचे समायोजन करणे बाकी आहे. याबाबत लक्ष देणे अपेक्षीत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक कर्मचाऱ्यांच्या अग्रीम रक्कमा किती, आणि त्या आता वसुल करावयाच्या असतील तर त्यांच्या प्रॉपर्टीवर बोजे चढवा. नोटीसेस देण्यात याव्या. ते पैसे वसुल केले पाहिजे, त्यांच्या पेन्शनमध्ये हप्ते टाकुन वसुल करु शकतात. तसेच ठेकेदारांचे देणी आहे कुणाचे आहे ते आतापर्यंत बुक ॲडजस्टमेंट का झाले नाही. हे पाहुन घ्या. त्या संबंधीत कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसेस काढा. या महिन्यात या सर्व कारवाई करायच्या. महिन्याभरानंतर अनुपालन अहवाल सादर करावा. पैसे कसे रिकव्हर करायचे याची व्यवस्था करावी. एकतर वनस्ट्रोकमध्ये भरुन घ्यावी नाहीतर पगारातुन समान हप्त्यात वसुल करुन घ्यावी. ठेकेदारांच्या बाबतीत त्यांचे डिपॉझिट असतील किंवा बिल दिल्यानंतर रिकुबमेंटची प्रोसेस करावी. इंटरेस्ट पेयेबल असेल त्याचा देखील अभ्यास करावा. नोटीसेस जेवढे रिकव्हर होतील हे पहावे. यासाठी लेखा विभागाशी कॉर्डीनेट करावे. ही कारवाई महिन्याभरात करावी. अनुपालन अहवाल महिन्याभरात पुढील स्थायीत ठेवावा.सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४२७ दिनांक ०६/०५/२०२५**

महानगरपालिकेच्या सन २०२३-२०२४ या वर्षाचे अग्रीम नोंदवही नमुना क्र. १४७ चे तपासणीत खालील अनियमीत बाबी निर्दशनास आलेल्या आहेत. सदर अनियमीततांचे तातडीने निराकरण होणे आवश्यक आहे.

सन २०२३-२०२४ चे अग्रीम नोंदवहीचे गोषवाऱ्या नुसार मार्च २०२४ अखेर एकुण रु.१६,०४,५६,८२५.४० (अक्षरी रु. सोळा कोटी, चार लक्ष छपन्न हजार आठशे पंचवीस रुपये चाळीस पैसे मात्र) एवढ्या रकमेचे अग्रीम समायोजन होणे बाकी आहे. या अग्रीमापैकी दि.१७/०३/१९६५ ते दि.११/१०/२००२ या कालावधितील (नगरपरीषद कालावधी) एकुण रु.१,२१,८२,६५८.४०/- मात्र एवढ्या रकमेचे अग्रीम समायोजन प्रलंबीत आहे.

उक्त अग्रीम ज्या अधिकारी/कर्मचारी यांचे कडे प्रलंबित आहे अशा अधिकारी/कर्मचारी यांचे पैकी अद्याप बरेच कर्मचारी/कंत्राटदार महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सध्या कार्यरत असू शकतात व त्यांचे कडील प्रलंबित अग्रीमाचे समायोजन करणे शक्य आहे. ज्या अधिकारी/कर्मचारी/कंत्राटदार यांचा ठाव ठिकाणा शोध होत नाही असे अधिकारी/कर्मचारी/कंत्राटदार यांचे कडील प्रलंबीत अग्रीम समायोजन/वसूली बाबत प्रशासनाने नियमानुसार योग्य ते पर्याय अवलंब करावेत.

दि.३०/०६/२००३ ते दि.३१/०३/२०२४ या महानगरपालिका कालावधीतील एकुण रु.१४,९४,१४,३५४=०० (अक्षरी रु. चौदा कोटी चौऱ्यान्नव लक्ष चौदा हजार तीनशे चौपन्न मात्र) या अग्रीम रकमेचे समायोजन बाकी आहे. सदर रकमे पैकी सन २०२३-२०२४ या वर्षात फक्त रु.११,३६,८०९=०० चे समायोजन झाले असुन अद्याप रु.१४,८२,७७,५४५=०० या रकमेचे समायोजन होणे बाकी आहे. प्रलंबित अग्रीम समायोजनाबाबत प्रशासनाने अग्रक्रमाने नियमानुसार कार्यवाही करावी.

अग्रीम नोंदवही सन २०२३-२०२४ मधील अ.क्र. ७१९ वरील नोंदी नुसार मे. आर. ए. धुळे कंत्राटदार, यांना UIDSSMT अंतर्गत पाणी पुरवठा योजना करीता रु.१३,५८,४२,३४३=०० एवढी रक्कम प्रमाणक क्र. ०६ दि.३०/१२/२०१४ अन्वये अग्रीम स्वरुपात दिल्याची नोंद आहे. तथापी सन २०२३-२०२४ चे अग्रीम नोंदवहीनुसार सदर अग्रीमाचे अद्याप समायोजन झालेले दिसुन येत नाही ही गंभीर बाब आहे. सदर अग्रीम समायोजनाबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

अग्रीम नोंदवहीतील नोंदीनुसार बरीच अग्रीम रकमा ह्या पदनामाने वितरीत करण्यात आलेल्या आहेत. सदर अग्रीम समायोजनाबाबत प्राधान्याने कार्यवाही करणे आवश्यक आहे. भविष्यात कोणतेही अग्रीम पदनामाने वितरीत होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

अग्रीम समायोजनाच्या प्रमाणक क्रमांक व दिनांक अथवा पावती क्रमांक व दिनांकाची नोंद अग्रीम नोंदवहीत घेण्यात आलेली नाही त्यामुळे प्रत्यक्षात अग्रीम समायोजनाबाबतची सत्यता पडताळणी करता येत नाही. लेखा विभागाने सर्व समायोजना संबंधातील प्रमाणक क्रमांक व दिनांकाच्या नोंदी सदर समायोजनासमोर करुन सांक्षाकित कराव्यात व समायोजन सत्यापित करावे.

अग्रीम नोंदवहीतील सर्व नोंदी प्राधिकृत अधिकारी यांनी साक्षांकीत केलेल्या नाहीत. सदर नोंदवहीतील सर्व नोंदी साक्षांकीत करुन सर्व प्रलंबित अग्रीमाचे विहीत कालावधीत नियमानुसार सामयोजन करणे बाबत कार्यवाही करावी.

अग्रीम नोंदवहीतील समायोजनाबाबतचा सर्व साधारण कल लक्षात धेता असे निर्दशनास येते की कर्मचारी/अधिकारी यांचे सेवा निवृत्तीचे वेळी किंवा तत्पश्चात अग्रीम समायोजन झालेले आहे. प्रत्यक्षात नियमानुसार अग्रीम प्रदानानंतर पुढील निश्चित कालावधीत अथवा जास्तीत जास्त त्याच आर्थिक वर्षाचे कालावधीत अग्रीम समायोजन करणे आवश्यक असतांनाही अशी कार्यवाही होत नाही त्यामुळे अग्रीम समायोजनाची थकबाकी मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. ही बाब महानगरपालिकेच्या आर्थिक शिस्तीचे विरुद्ध आहे.कर्मचारी/अधिकारी/कंत्राटदार यांना पूर्वी दिलेले अग्रीमाचे समायोजन झाले असल्याची खात्री करुनच नवीन अग्रीम नियमानुसार अनुज्ञेय आहे तथापी महानगरपालिकेमार्फत या नियमाचे पालन न करता अग्रीम वितरीत करण्यात आलेला आहे.

करीता सर्व प्रलंबित अग्रीमाचे समायोजन करण्यासाठी कालबद्ध नियोजन करुन प्रलंबीतता दुर करण्यात यावी. यास्तव सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे लेखापरीक्षण विभागामार्फत सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, अग्रीम समायोजनासाठी संबंधित कर्मचाऱ्यांना तातडीने नोटीसेस देऊन वेतनातून व निवृत्तीवेतनातून अग्रीम वसुलीबाबत कार्यवाही करावी. तसेच ज्या ठेकेदारांकडे अग्रीम रकमा प्रलंबित आहे त्यांचे डिपॉझिट तथा देयकातून अग्रीम वसुली करण्यात यावी. लेखापरीक्षण विभाग व लेखा विभागाने समन्वय ठेऊन सदरची कार्यवाही १ महिन्याच्या आत पूर्ण करावी. व याबाबतचा अनुपालन अहवाल मे. स्थायी समितीपुढे सादर करावा. सदरची कार्यवाही करण्यास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४५० लेखापरीक्षण अहवालातील प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालन करणे बाबत जबाबदारी निश्चीत करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपमुख्य लेखा परिक्षक मनपाचे जे लेखापरिक्षण केले जाते. त्यात मनपा महालेखाकार, मुंबई यांचे ऑडीट व दुसरे स्थानिक निधी लेखा परिक्षण, मुंबई या यंत्राणांमार्फत नियमीत लेखा परिक्षण झाल्यानंतर मा.आयुक्त यांचे नावे लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करण्यात येतात. स्थानिक निधी यांच्या ज्या जनरल ऑडीट नोटस येतात त्यावर मात्र संबंधीत विभागाकडुन कारवाई केली जात नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक मागील सन 2016-17 चे झालेले ऑडीट, आधीचे पेंडीग असलेले लोकल फंड चे ऑडीट पॅरा, कंम्पलायन्सेस त्यानंतर एजी मुंबई चे झालेले ऑडीट पॅरा कंम्पलायन्सेस यासाठी विशेष मोहिम राबवा. या महिन्याभरात सगळया विभागाने त्यांचे त्यांचे ऑडीट पॅरा कंम्पलायन्सेस कुठल्याही परिस्थितीत संपावायचे. तसेच इंटर्नल ऑडीट विभागाने देतांना मोघम अहवाल देवु नये. देतांना ईअरवाईज द्यावे. आणि विभागनिहाय द्यावे. महिन्या भरात सर्व विभागाचे झाले पाहिजे. ज्यांचे पेंडींग राहतील त्यांचे पगार होणार नाही. यात रिकव्हरीवाले विषय देखील संपुन जातील. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४२८ दिनांक ०६/०५/२०२५**

उपरोक्त विषयी असे निर्देशनास आले आहे की महानगरपालिकेचे विवीध शासकीय व संविधानिक यंत्रणा मार्फत जमा व खर्चाचे नियमीत लेखापरीक्षण करण्यात येते. या मध्ये प्रामूख्याने मुख्य लेखापरीक्षक, महानगरपालिका, महालेखाकार कार्यालय, मुंबई व स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, मुंबई यांचा समावेश आहे. या यंत्रणामार्फत नियमीत लेखापरीक्षण झाल्या नंतर मा. आयुक्त यांचे नावे लेखापरीक्षण अहवाल निर्गमीत करण्यात येतात.

महानगरपालिकेच्या जमा व खर्चाच्या नोंदी बाबत महानगरपालिकेचा संबंधित विभाग व जमा व खर्च प्रधिकृत करणारा सक्षम प्रधिकारी या नात्याने लेखा विभागाने संबंधित विभागामार्फत लेखापरिक्षणात निर्देशनास आणून दिलेल्या लेखापरिक्षण परिच्छेदांचे अनुपालन तयार करुन घेणे, अनुपालनाची पडताळणी करणे व अनुपालन सक्षम प्रधिकारी यांचे स्वाक्षरीने सर्वसंबधित यंत्रणेस सादर करणे अपेक्षीत आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये जमा अथवा खर्च करणारा संबधित विभाग व या जमा व खर्चास प्रधिकृत (Passing & paying Anthority) करणारा लेखा विभाग यांची संनियत्रणाची भूमीका असून महानगरपालिकेच्या सर्व प्रलंबित परीच्छेदाबाबत नियमित अढावा घेणे, त्यांचे अनुपालन तपासणे व अनुपालना बाबत शासनास व विविध संविधानिक यंत्रणाशी समन्वय प्रस्थापित करणे आवश्यक आहे.

तथापि असे निर्देशनास आले आहे की महानगरपालिकेचे सर्व लेखापरिक्षण अहवाल महानगरपालिकेच्या लेखापरिक्षण विभागाकडे अग्रेषित केले जातात व अशा प्राप्त लेखापरिक्षण अहवालांवर या विभागाकडून मागील वर्षाचे कालावधीत कोणतीही कार्यवाही झालेली नाही व अशी अनुपालन कार्यवाही अपेक्षीतही नाही.

संबंधित यंत्रणेकडून लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झालेनंतर सदर अहवालावरील प्राथमिक अनूपालन अहवाल तयार करणे व या प्राथमिक अनूपालन अहवालासह सदर अहवाल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसमोर सादर करणे व तदनंतर लेखापरीक्षण अहवालातील अक्षेपांनुसार सर्व दुरुस्त्या करुन अंतीम अनूपालन संबंधित यंत्रणेस सादर करणे ही अनुपालनाची प्रक्रिया असतांना अशी प्रक्रिया पुर्ण न करता सर्व लेखापरीक्षण अहवाल कोणत्याही वैधानिक कार्यवाही शिवाय प्रलंबित राहीले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

प्रत्यक्षात मूख्य लेखापरीक्षक, महानगरपालिका ही एक महानगरपालिकेची स्वतंत्र संविधानिक लेखापरीक्षण यंत्रणा असुन या यंत्रणेमार्फत महानगरपालिकेच्या झालेल्या खर्चाचे व जमेचे नियमीत लेखापरीक्षण करणे अपेक्षित आहे व या लेखापरीक्षण अहवालाचे महानगरपालिकेने अनुपालन सादर करणे अपेक्षीत आहे.

तथापी लेखापरीक्षण विभागाकडेच इतर लेखापरीक्षण यंत्रणांनी केलेल्या लेखापरीक्षण अहवाल पुढील कार्यावाहीस्तव वर्ग करणे ही बाब आनाकलनिय आहे. त्यामुळे उरोक्त वस्तूस्थिती लक्षात घेता लेखापरीक्षण अहवालांचे अनुपालन व निर्देशनास आणून दिलेल्या सर्व अनियमीत बाबींचे संदर्भात भविष्यातील व्यवहारावरील दुरुस्त्या व कार्यान्वयनातील

सूधारणा साध्य करण्याच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेने सर्व संबधीत यंत्रणांची जबाबदारी निश्चीत करणे आवश्यक आहे. त्यामुळे लेखापरीक्षणात निर्देशनास आणून दिलेले दोष व त्रुटीं नुसार भविष्यातील व्यवहार दुरुस्त होण्यास व अनियमीतता कमी होण्यास मदत होऊ शकेल अन्यथा लेखापरीक्षण अहवालांचे अनुपालना अभावी भविष्यात लोकलेखा समिती, मा. सचीव साक्ष व नागरी राज समिती अशा यंत्रणांचे रोषास व कार्यवाहीस सामेरे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे याबाबत तात्काळ योग्य ते निश्चीत धोरण ठरवून महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभाग, लेखा विभाग व सर्व संबधित विभागाची भूमिका व जबाबदारी निश्चीत करणे आवश्यक आहे. यास्तव सदर प्रस्ताव मे. स्थायी समितपुढे लेखापरीक्षण विभागामार्फत सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता सदरची बाब गंभीर स्वरुपाची आहे. सदर लेखापरीच्छेदांचे अनुपालन होण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, लेखापरीक्षण विभाग व लेखा विभागामार्फत विशेष मोहिम घेण्यात यावी. लेखापरीक्षण विभागाने वर्ष निहाय व विभाग निहाय परीच्छेद संबंधीत विभागांना वितरीत करावे. संबंधित विभागांनी त्याबाबत एक महिन्याच्या आत अनुपालन अहवाल तथा त्याबाबतची पूर्तता करावी. त्यानुसार सदरची कार्यवाही करण्यास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४५१ नटराज थेटर मागे निळा चौक येथील CCTV कॅमेरे दुरुस्ती करणेकामी खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता निळा चौक, राजीवगांधी नगर, नटराज थिएटरमागील ई. ठिकाणी भागात सिसिटीव्ही कॅमेरे बसविले होते. संवेदनशील भाग असल्यामुळे रु.२४८९०/- इतका खर्च झाला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक याचे मॉनिटरींग कोण करते.

मा.उपअभियंता पोलिस चौकी आहे तेथील कॉन्स्टेबल करतात.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४२९ दिनांक ०६/०५/२०२५**

निळा चौक,राजीव गांधी नगर,नटराज थेटर मागील भाग ई.ठिकाणी भागात तसेच समोरील बाजूस व्यापारी वर्ग आणि नोकरदार वर्ग लोकांची कॉलनि आहे.दोन्ही वसाहतीच्या मध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीकडे जाणारा वर्दळीचा मार्ग आहे.या ठिकाणी नेहमी वर्दळ असते. त्यानुसार सदर ठिकाणी २०२१-२२ मध्ये मनपातर्फे सुरक्षेच्या दृष्टीने सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेत आले होते.सदर कामाचा देखभाल दुरुस्ती कालावधी समाप्त झाला असून,सदर क्यामेरे बंद असून झालेले असून,चालू करणे गरजेचे आहे याबाबत संदर्भनुसार अर्ज प्राप्त आहे.त्यानुसार सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता ६ कॅमेरे,मोनिटर,केबल ई.साहित्य नवीन टाकणे गरजेचे आहे.सदर खर्चहा सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार CCTV कॅमेरे कामासाठी रु.२५ लक्ष मात्र तरतूद आहे.यातून सदर खर्च प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास कोटेशन नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.२४,८९०/-चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा यासिन

अन्सारी(अन्सारी इंटरप्राइजेस) यांच्या कडून करून घेणास व कार्योत्तर मंजुरी करिता सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३) अन्वये मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव विचारात घेता, नटराज थेटर मागे निळा चौक येथील CCTV कॅमेरे दुरुस्ती करणेकामी खर्च रुपये रु.२४,८९०/- मात्र झालेल्या खर्चास महाराष्ट्रा महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४५२ धुळे महानगरपालिका अग्निशामक विभागाकडील वाहन क्र. एम.एच.१८ एफ.०२५८ वाहनाचे दुरूस्ती खर्च रुपये १,३५,७५०/- करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.अधिक्षक वाहन विभाग वाहन क्रं.MH-18 F 0258 व वाहन क्रमांक MH-18 G 0259 या अग्निशमन विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील वाहनांचे टायर पुर्णपणे खराब झाले असलेबाबत अहवाल त्यांनी वाहन विभागाकडेस सादर केला होता. तरी वाहन विभागाकडुन वाहनाच टायरची तपासणी करणेकामी यंत्र अभियंता राज्य परिवहन यांनी वाहनांच्या टायरची तपासणी करुनप अहवाल सादर केले आहे. टायर चिकणे (स्मुद) होवुन बाकीचे टायरही खराबच आहेत असे त्यांचे स्पष्ट मत आहे. ते कधीही फुटण्याची शक्यता आहे. सदरील वाहने अत्यावश्यक सेवेतील असल्याने टायर खरेदीसाठी रु. 1,35,750/- मात्रला मंजुरीसाठी मे. स्थायी समिती समोर विषय आला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक त्यासोबत अग्निशमन विभागातील वाहनाचे छोटे मोठे रिपेअर्स देखील करुन घ्यावे. तसेच वरखेडी डेपोवर दोन फिडर पॉईन्ट करावे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४३० दिनांक ०६/०५/२०२५**

वाहनचालक व सहा.अग्निशमन अधिकारी यांच्या अहवालानुसार धुळे महानगरपालिका सार्वजनिक सुरक्षितता (अग्निशामक) विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील अग्निशामक वाहन क्रं एम.एच.१८ एफ. ०२५८ व एम.एच.१८ जी. ०२५९ या वाहनांचे टायर पुर्णपणे खराब झाले असलेबाबत त्यांनी वाहन विभागाकडेस अहवाल सादर केला होता सदरील वाहन क्रं एम.एच.१८ एफ.०२५८ व एम.एच.१८.जी.०२५९ या वाहनांचे काही टायर पुर्णत: खराब झाले आहे असुन चिकने(स्मुथ) गोटा झालेले आहेत व बाकीचे टायरही खराबच होत आहे. व ते कधीही फुटण्याची शक्यता आहे असा अहवाल प्राप्त आहे. तरी सदरील वाहने ही आपात्कालीन व अत्यावश्यक सेवेतील असल्याने व उन्हाळयाचे दिवस सुरु असल्याने शहरात कधीही आगीची घटना होण्याची संभावना लक्षात घेता तात्काळ एम.एच.१८ एफ.०२५८ या वाहनाचे सर्व टायर असे पाच (५) नग नविन खरेदी करणे आवश्यक असल्याने त्यासाठी एकूण खर्च रुपये १,३५,७५०/- मात्र येणार आहे.

टायरचे खरेदीचे श्री. बंसल टायर हाऊस यांचे कडून अंदाजित इस्टीमेट घेण्यात आले आहे. तसेच सन २०२४-२५ या चालु आर्थीक वर्षात आजपावेतो खर्च १,०७,७१५/- खर्च करण्यात आलेला आहे. चालु बिलातील खर्च रक्कम १,३५,७५०/-मात्र येत आहे.असे एकुण सन २०२४-२५ या चालु आर्थिक वर्षात २,४३,४६५/- मात्र खर्च होत आहे.

उक्त खरेदीसाठी खर्च रक्कम १,३५,७५०/- मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियमातील तरतुदी विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ ब) नुसार मे.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, अग्निशामक विभागाकडील वाहन क्र. एम.एच.१८ एफ.०२५८ वाहनाचे दुरूस्ती खर्च रुपये १,३५,७५०/- करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४५३ धुळे महानगरपालिका अग्निशामक विभागाकडील वाहन क्र. एम.एच.१८ जी.०२५९ वाहनाचे दुरूस्ती खर्च रुपये १,३५,७५०/- करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४३१ दिनांक ०६/०५/२०२५**

वाहनचालक व सहा.अग्निशमन अधिकारी यांच्या अहवालानुसार धुळे महानगरपालिका सार्वजनिक सुरक्षितता (अग्निशामक) विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील अग्निशामक वाहन क्रं एम.एच.१८ एफ. ०२५८ व एम.एच.१८ जी. ०२५९ या वाहनांचे टायर पुर्णपणे खराब झाले असलेबाबत त्यांनी वाहन विभागाकडेस अहवाल सादर केला होता सदरील वाहन क्रं एम.एच.१८ एफ.०२५८ व एम.एच.१८.जी.०२५९ या वाहनांचे काही टायर पुर्णत: खराब झाले आहे असुन चिकने(स्मुथ) गोटा झालेले आहेत व बाकीचे टायरही खराबच होत आहे. व ते कधीही फुटण्याची शक्यता आहे असा अहवाल प्राप्त आहे. तरी सदरील वाहने ही आपात्कालीन व अत्यावश्यक सेवेतील असल्याने व उन्हाळयाचे दिवस सुरु असल्याने शहरात कधीही आगीची घटना होण्याची संभावना लक्षात घेता तात्काळ एम.एच.18 जी ०२५९ या वाहनाचे सर्व टायर असे पाच (5) नग नविन खरेदी करणे आवश्यक असल्याने त्यासाठी एकूण खर्च रुपये १,३५,७५०/- मात्र येणार आहे. टायरचे खरेदीचे श्री. बंसल टायर हाऊस यांचे कडून अंदाजित इस्टीमेट घेण्यात आले आहे.

तसेच सन २०२४-२५ या चालु आर्थीक वर्षात आजपावेतो खर्च १,०७,७१५/- खर्च करण्यात आलेला आहे. चालु बिलातील खर्च रक्कम १,३५,७५०/-मात्र येत आहे.असे एकुण सन २०२४-२५ या चालु आर्थिक वर्षात २,४३,४६५/- मात्र खर्च होत आहे.

उक्त खरेदीसाठी खर्च रक्कम १,३५,७५०/- मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियमातील तरतुदी विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ ब) नुसार मे.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, अग्निशामक विभागाकडील वाहन क्र. एम.एच.१८ जी.०२५९ वाहनाचे दुरूस्ती खर्च रुपये १,३५,७५०/- करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४५४ माझी वसुंधरा २.० अभियान अंतर्गत मालेगाव रोड पंपिंग स्टेशन येथे ५० kwp चे ऑन ग्रीड सोलर सिस्टीम बसविणेकामी क्युबिकल मीटरिंगसाठी रूम चे बांधकाम करणेकामी खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक याची प्रोसेस करुन घ्यावी आणि याचे सोलर नेट मिटरिंगचे काम कधी होईल.

मा.उपअभियंता नेट मिटरिंगचे काम चालु झाले आहे. मालेगावरोडवरील जलकुंभाचे एक महिन्याचे रिडींग 6000 युनिट KWH जनरेट झाले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक लाईट बिल किती येत होते.

मा.उपअभियंता त्या ठिकाणी पंप चालु असल्यामुळे रु. 3.5 ते 5 लाखापर्यंत लाईट बिल येत होते. जवळपास अडीच लाखाचे सेव्हिंग होईल. तसेच बापट दवाखाना येथेही नेट मिटरिंग चालु झाले आहे. तसेच या प्रशासकीय इमारतीचे 15 दिवसात चालु होईल. थर्ड पार्टी इन्सेक्शन राहिले पाहिजे.

मा.आयुक्त तथा प्रशासक वरखेडी डेपोवरील जागा क्लिअर करुन काम चालु करावे. बायोमायनिंगचे तात्काळ करा. उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे आग लागते. तेथील कामे तात्काळ करावी. जागेची मोजणीचे एक ॲप्लीकेशन देवुन ठेवा. ऑनलाईन ॲप्लाय करुन ठेवा म्हणजे मोजणीची तारीख मिळेल. ती जागेची मोजणी करुन घ्यावी. ती जागा खाली करण्यात यावी.सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४३२ दिनांक ०६/०५/२०२५**

माझी वसुंधरा २.० अभियान अंतर्गत प्राप्त झालेल्या बक्षिस रक्कमेमधून उक्त ठिकाणी ऑन ग्रीड सोलर सिस्टीम बसविणे कामी मे.प्रयास इलेक्ट्रोसिस्टीम,ठाणे यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे.त्यानुसार मनपा नंदी रोड दवाखाना,मनपा सुभाष नगर प्रस्तुती दवाखाना, जुनी मनपा प्रस्तुती दवाखाना,प्रभात नगर दवाखाना या ठिकाणचे काम पूर्ण झाले आहे.परंतु मालेगाव रोड पंपिंग स्टेशन ह्या ठिकाणी HT मीटर असल्याने सदर ठिकाणी ११ KV HT क्युबिकल मीटरिंग कार्यान्वित करणेसाठी लागणारे १२*१० रूम बांधकामची बाब मंजूर अंदाजपत्रकात नसल्याचे पत्र प्राप्त आहे.तथापि याकामी अंदाजीत खर्च रक्कम रु.२,६५,८८३/- GST सह अपेक्षित आहे. सदर खर्चहा सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार सदर खर्च प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु.२,६५,८८३/- चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा मे.प्रयास इलेक्ट्रोसिस्टीम, ठाणे, प्रा.लि यांच्या कडून करून घेण्यास व कार्योत्तर मंजुरी करिता सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३) अन्वये सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल विचारात घेता, माझी वसुंधरा २.० अभियान अंतर्गत मालेगाव रोड पंपिंग स्टेशन येथे ५० kwp चे ऑन ग्रीड सोलर सिस्टीम बसविणेकामी क्युबिकल मीटरिंगसाठी रूम चे बांधकाम करणेकामी झालेला खर्च रुपये २,६५,८८३/- GST सह मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४५५ धुळे महानगरपालिका कडील स्वच्छ सर्वेक्षण 2024 करीता व आरोग्य विषयां संदर्भात विविध साहित्य व त्यावर प्रिन्टींग तयार करुन लावण्यात आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४३३ दिनांक ०६/०५/२०२५**

मा.उपायुक्त सो यांचे दालनात झालेल्या तातडीचे बैठकीत शहरातील नागरीका मध्ये जनजागृती करणे करीता शहरातील क्षेत्रात असे अनेक ठिकाणी विविध साहित्य व त्यावर छपाई करून लावणेस सुचित करणेत आले होते.

तसेच सदर काम हे प्रिन्टींग करणे असल्याने आपले कडील शासकीय पुरवठा धारक अलका प्रिन्टर्स हे डिलीटल बॅनर प्रिन्टींग चे काम करीत असता त्यांचे कडेस इतर साहित्याचा बाजार दर तपासुन त्यांचे बाजार दर इतरांपेक्षा कमी असल्याने सदरचे काम तातडीचे असल्याने त्यांचे कडुन करून घेण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे संबधीत कामाच्या सुचनेनुसार शहरात निर्देशीत केलेल्या ठिकाणी नियोजित वेळेत काम पुर्ण केलेले आहे. त्यानुसार अनुक्रमे अलका प्रिन्टर्स धुळे यांनी प्रस्तावात नमूद एकूण १ ते २७ कामांसाठी मंजूर दरानुसार झालेला खर्च रुपये ६,००,६४४.००/- मात्र मागणी केली आहे.त्यानुसार सदर प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, धुळे महानगरपालिका कडील स्वच्छ सर्वेक्षण २०२४ करीता व आरोग्य विषयां संदर्भात विविध साहित्य व त्यावर प्रिंन्टींग तयार करुन लावण्यात आलेल्या कामासाठी झालेला खर्च रुपये ६,००,६४४/- GST सह मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४५६ धुळे महानगरपालिका मालमत्ता कराची थकबाकी खटला बाबत राष्ट्रीय लोक अदालत आयोजनाकरीता झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४३४ दिनांक ०६/०५/२०२५**

सचिव, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण,धुळे महानगरपालिका मालमत्ता कराची थकबाकी खटला बाबत राष्ट्रीय लोक अदालत आयोजन करण्यात आलेले आहे. खटला पूर्व प्रकरणांचे दिनांक १४/१२/२०२४ रोजी राष्ट्रीय अदालतचे धुळे जिल्हा न्यायालय येथे आयोजन केले आहे.

सदर लोक अदालत मध्ये भाग घेणे बाबत मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजुरीने मालमत्ता कर अधिक्षक यांच्या मार्फत होणाऱ्या खर्चासाठी भांडार विभाग कार्यालयाकडुन कार्यवाही होणे बाबत भांडार विभाग कडेस मागणी रिपोर्ट सादर केला असता सदरचे काम तातडीचे असल्याने सदरच्या कामाबाबत धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स ॲण्ड केटरर्स,धुळे त्यांच्याकडुन सदरचे काम करुन घेण्यात आलेले आहे. त्याअन्वये सदरच्या सेवाधारकांनी

एकूण ५७७०२/- मात्रचे बिल सादर केले आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव विचारात घेता, धुळे महानगरपालिका मालमत्ता कराची थकबाकी खटला बाबत राष्ट्रीय लोक अदालत आयोजनाकरीता झालेल्या खर्च ५७७०२/- GST सह मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४५७ वृक्ष लागवडी करिता JCB लावणे कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरीसाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४३५ दिनांक ०६/०५/२०२५**

प्रशासनाच्या मार्फत धुळे शहरातील विविध भागांमध्ये वृक्ष लागवडीची मोहिमे राबविण्यात आली. सदर मोहिमे अंतर्गत विविध प्रभागांमध्ये व पांझरा नदी किनार वृक्ष लागवड करणे बाबत JCB लावणे आवश्यक आहे.

उक्त कामी वृक्ष लागवडीची मोहिमे अंतर्गत तातडीने JCB लावणे आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा मे.समर्थ कन्सट्रक्शन , ठेकेदार, धुळे यांचे मार्फत करणे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (३) (क) अन्वये त्वरित काम करण्यास व ५(२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.९,९६,८६४/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, वृक्ष लागवडी करिता JCB लावणे कामी झालेला खर्च रु.९,९६,८६४/- GST सह मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४५८ अशोक नगर येथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे बाबत झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक अशोक नगर जलकुंभाचे काम कुठपर्यंत आले.

मा.उपअभियंता १० तारखेपर्यंत जमिन लेव्हलपर्यंत होवुन जाईल.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४३६ दिनांक ०६/०५/२०२५**

अशोक नगर येथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे बाबत उक्तबाबत संबधित भागातील क. अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता अशोक नगर येथे नागरिकांना पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत असल्यामुळे पाईप लाईन टाकणे गरजेचे होते.

सदरचे कामी excavation in soft murum, providing & laying sluice valve, TailPiece, providing & layingHDPE Pipe line, providing & joint, M-10, Dewatering, इत्यादी बाबी समाविष्ट असून, सदर कामासाठी शासन दरसूची/म.जी.प्रा.विभाग/२०२३-२४ नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू. २,२६,८९८/- मात्र खर्च अपेक्षित आहे.सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार नवीन पाईपलाईन टाकणे निधीतुन कामासाठी रू. ५० लक्ष मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु. २,२६,८९८/- चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा ठेकेदार श्री. संजय गायकवाड यांच्या कडून करून घेणास व कार्योत्तर मंजुरी करिता मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, अशोक नगर येथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे बाबत झालेला खर्च रू. २,२६,८९८/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४५९ नकाणे गावात सिमेंट पाईप लाईन टाकणे बाबत झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४३७ दिनांक ०६/०५/२०२५**

नकाणे गावात सिमेंट पाईप लाईन टाकणे बाबत उक्तबाबत संबधित भागातील क. अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता नकाणे गावात सिमेंट पाईप लाईन गळती होत असल्यामुळे स्थलांतरित करणे गरजेचे होते.

सदरचे कामी excavation in soft murum, providing & layingDI, MS Pipe line, M-10, Dewatering, , providing & laying sluice valve, इत्यादी बाबी समाविष्ट असून, सदर कामासाठी शासन दरसूची/म.जी.प्रा.विभाग/२०२३-२४ नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू. ७,३७,४०९/- मात्र खर्च अपेक्षित आहे.सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार नवीन पाईपलाईन टाकणे निधीतुन कामासाठी रू. १२५ लक्ष मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु. ७,३७,४०९/- चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा ठेकेदार श्री. संजय गायकवाड यांच्या कडून करून घेणास व कार्योत्तर मंजुरी करिता मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता नकाणे गावात सिमेंट पाईप लाईन टाकणे बाबत झालेला खर्च रक्कम रु. ७,३७,४०९/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४६० शिवजयंती २०२५ निमित्त विविध अनुषंगिक व्यवस्था /कामे करणे कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४३८ दिनांक ०६/०५/२०२५**

धुळे शहरात दरवर्षी प्रमाणे शिव छत्रपती शिवाजी महाराज जयंती 19 फेब्रुवारी 2025 ला मनोहर चित्रपट गृह जवळील पुतळा येथे साजरी करण्यात येते, त्या अनुषंगाने शिवजयंती उत्सवा निमित्त विविध कार्यक्रम व्यवस्था करणे व इतर अनुषंगीक कामे मनपा तर्फे करणेत येतात.

त्या अनुषंगाने स्मारकांना फोकस व लाईटींग करणे मनोहर चित्रमंदिरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकांला ओरिजन फुलांची सजावट करणे, स्वागत कमान व बक ड्रोप पडदा ,आग्रा रोड चौकांमध्ये फोकस फल्ड लाईट लावणे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाजवळ साऊंड सिस्टम व्यवस्था करणे व स्मारकाजवळ स्टेज बरेगेट, ब्लक पडदा व्यवस्था करणे,मंडप,लाईटिंग,LED स्क्रीन,राजवाडा सेटअप ई.अनुषंगिक कामे व्यवस्था मे,धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर,धुळे यांच्या कडून करून घेण्यात आली, सदरच्या कामासाठी खर्चे देयक मे,धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर,धुळे यांनी खर्च रु.७,४८,७१०/- (१८ % GST सह ) मात्र सादर केले आहे.

तरी उक्त कामे तातडीने व मुदतीत करणे आवश्यक असल्याने या कामास बाजारभाव दर रु ७,४८,७१०/- (१८ % GST सह ) चे काम करण्यात आले असून सदरचे काम विना निविदा मे,धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर, धुळे यांच्या कडून करून घेतलेले आहे. सदर प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, शिवजयंती २०२५ निमित्त विविध अनुषंगिक व्यवस्था /कामे करणे कामी झालेला खर्च रुपये ७,४८,७१०/- ( १८ % GST सह ) मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४६१ धुळे महानगरपालिकेतील डॉ. जे.सी. पाटील, शहर क्षयरोग अधिकारी (मानधन) यांच्या पुननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक चांगले काम करत आहे. धुळे मनपाचे टीबी युनिट राज्यस्तरावर नावाजले गेले. डॉ. जे.सी.पाटील, डॉ. संपदा कुलकर्णी, डेप्युटी कमिशनर मॅडम, ॲडीशनल कमिशनर मॅडम या सगळयांचे विशेष अभिनंदन. हे सलग दुसरे वर्ष आहे. या सर्वांच्या प्रयत्नामुळे क्षयरोगावर आपण राज्यस्तरावर चांगले काम करु शकतो. आणि राज्याच्या आरोग्य विभागाकडुन,

सार्वजनिक आरोग्य विभागाकडुन सातत्याचे दुसऱ्यांदा मनपाला पुरस्कार मिळावा. सर्व युनिटचे अभिनंदन.सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४३९ दिनांक ०६/०५/२०२५**

धुळे महानगरपालिकेतील मानधनावरील कार्यरत शहर क्षयरोग अधिकारी डॉ. जे.सी. पाटील यांची मानधनावरील नियुक्ती कालावधी त्यांच्या नावासमोर नमूद नुसार संपुष्टात येत आहे.

| अ.क्र | कर्मचा-याचे नाव | हुद्दा | मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक | मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. जे.सी. पाटील | शहर क्षयरोग अधिकारी | २८/२/२०२५ | ५०,०००/- |

तरी डॉ.पाटील यांची सेवा संबंधित विभागाकरीता आवश्यक असल्याने वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी उक्त नमुद अधिकारी यांना पुर्ननियुक्ती देणेबाबत शिफारस केलेली आहे.

तरी संबंधित विभाग प्रमुख याच्या विनंतीनुसार उक्त नमूद मानधनावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनाकापासून ०५ दिवसाची सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिन्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मुदतवाढ देणेबाबतचा विषय मे. स्थायी समितीपूढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन प्रस्ताव विचारात घेता, मानधनावरील कर्मचारी डॉ. जे.सी. **पाटील यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासुन 05 दिवसाची सेवा खंडीत करुन एकत्रित मानधनावर पुढील 06 महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (3) नुसार कार्योत्तर मान्यता** वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४६२ देवपूर नवरंग पाण्याच्या टाकी जवळ, भाजीपाला मार्केट करिता स्मार्ट 4G सोलर कॅमेरा बसविणे कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक देवपुर मुख्य रस्त्यावर पुन्हा भाजीपाला विक्रेते, स्टॉल वाढले. तो रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाचा आहे. जाऊन अभियंता श्री. आर.आर.पाटील साहेब यांना भेटुन घ्या. आपण एव्हढी त्यांना जागा उपलब्ध करुन देवुन अतिक्रमण वाढली. तीच परिस्थिती साक्रीरोडची आहे. देवपुर भाजी मंडईचे काम लवकर करावे. जेणेकरुन रस्त्यावरुन भाजी विक्रेते तिकडे स्थलांतरीत होतील. मी देखील या संदर्भात अभियंता श्री. आर.आर.पाटील साहेब व मा. जिल्हाधिकारी सो. यांच्याशी बोलेन. यासाठीचे सर्व मिळुन नियोजन करावे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४४० दिनांक ०६/०५/२०२५**

देवपूर मुख्य रस्ताच्या आजूबाजूस बसणारे भाजीपाला विक्री करणारे स्टोल्स, दुकाने, ढकलगाड्या असल्याने भाजीपाला, फळे घेण्यास नागरिकांची गर्दी होत असते. म. आमदार अनुपभैय्या अग्रवाल यांनी कार्यवाही करत सर्वे क्र. २८/२ , देवपूर नवरंग पाण्याच्या टाकी जवळ जागा उपलब्ध असल्याने सदर ठिकाणी भाजीपाला मार्केट स्थलांतर करण्यात आले,

सदर ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल सुविधा उपलब्ध करून देण्यास तात्काळ निर्देश दिले होते. तसेच सी.सी.टी.व्ही सुविधा उपलब्ध करून देण्यास निर्देश देण्यात आले होते.

सदर देवपूर नवरंग पाण्याच्या टाकी जवळ, भाजीपाला मार्केट सी.सी.टी.व्ही सुविधा करिता 4G सोलर कॅमेरा, ६४GB मेमरी कार्ड करिता ची आवश्यकता आहे. सदरच्या कामासाठी खर्च रु ५३,२४२/- ( १८ % GST सह ) मात्र आहे. सदरचे काम बाजारभाव दराप्रमाणे आहेत. सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार दिवे व साहित्य दुरुस्ती करिता १.५ कोटी रु. मात्र तरतूद आहे. उक्त तरतुदीनुसार काम तातडीने करणे आवश्यक असल्याने काम विना निविदा मे. चैतन्य टेलीकॉम, धुळे यांच्या कडून पूर्ण करून घेतले आहे.

यास्तव सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३) प्रमाणे कार्योत्तर मंजुरीसाठी म. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, देवपूर नवरंग पाण्याच्या टाकी जवळ, भाजीपाला मार्केट करिता स्मार्ट 4G सोलर कॅमेरा बसविणे कामी झालेला खर्च रुपये ५३,२४२/- (१८ % GST सह ) मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) प्रमाणे कार्यात्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४६३ देवपूर नवरंग पाण्याच्या टाकी जवळ, भाजीपाला मार्केट करिता ८ मीटर स्ट्रीट लाईट पोल बसविणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४४१ दिनांक ०६/०५/२०२५**

देवपूर मुख्य रस्ताच्या आजूबाजूस बसणारे भाजीपाला विक्री करणारे स्टोल्स, दुकाने, ढकलगाड्या असल्याने भाजीपाला, फळे घेण्यास नागरिकांची गर्दी होत असते. म. आमदार अनुपभैय्या अग्रवाल यांनी कार्यवाही करत सर्वे क्र. २८/२ , देवपूर नवरंग पाण्याच्या टाकी जवळ जागा उपलब्ध असल्याने सदर ठिकाणी भाजीपाला मार्केट स्थलांतर करण्यात आले, सदर ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल सुविधा उपलब्ध करून देण्यास तात्काळ निर्देश दिले होते.

सदर प्रस्तावित देवपूर नवरंग पाण्याच्या टाकी जवळ, भाजीपाला मार्केट स्ट्रीट लाईट पोल सुविधा करिता ९ मीटर स्ट्रीट लाईट पोल पथदिवे सह बसविणे करिता अर्थिंग, ३ x ६ Sqmm केबल, १०० W फ्लड लाईट, FRP बॉक्स, FPMCB 32Amp, Iron Work करिता शासनदरसूची/ सा.बा./ विद्युत /२०२२-२३ नुसार अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रु २,१७,६८८/- मात्र अपेक्षित आहे. सदरचे काम शासकीय दरसूची दराप्रमाणे योग्य व उचित आहे. सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतुदी नुसार दिवे व साहित्य करिता कामासाठी रु. १.५ कोटी मात्र तरतूद आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय दर रु २,१७,६८८/- नुसार चे काम करण्यात आले असून सदरचे काम विना निविदा मे. अंबिका इलेक्ट्रीकल, धुळे यांच्या कडून करून घेतले असून कार्योत्तर मंजुरी करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३) (क) अन्वये स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, देवपूर नवरंग पाण्याच्या टाकी जवळ, भाजीपाला मार्केट करिता ८ मीटर स्ट्रीट लाईट पोल बसविणेकामी झालेला खर्च रुपये २,१७,६८८/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) प्रमाणे कार्यात्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४६४ धुळे महानगरपालिका अंतर्गत १ ते २० महानगरपालिका शाळा व हायस्कूल परिसरात **C.C.T.V** कॅमेरे बसविणे आलेल्या निविदादरास मान्यता देणेबाबत कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता यापुर्वी आपण यासाठी निविदा काढली होती. त्या संबंधीत ठेकेदाराने काम केले नाही. आता सेकंड कॉल केला आहे. यासाठीचे नाशिकचे युनिवर्सल कम्युनिकेशन यांनी – ५ टकके कमीने निविदा आली आहे. याबाबत त्यांना कालच निरोप दिला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक आपण सर्व शाळांचा मुख्याध्यापकांची बैठक घेतली, त्यांच्या मागण्या जाणुन घेतल्या. प्रत्येक शाळेला रेडीमेड सोल्युशन न देता त्या त्या शाळेची काय गरज आहे ते बघुन तेथे तुम्ही काम करावे. काही शाळांची परिस्थिती दयनिय आहे. तेथे वरवरची कामे करुन चालणार नाही. ज्या शाळेचे आयुष्य संपले आहे तेथे तुम्हाला राईट ऑफ करावे लागेल. त्याचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन अहवाल घ्या. प्रत्येक शाळा निहाय मुख्याध्यापकाला बसवुन २ दिवसात त्याचे नियोजन करावे. आणी त्याप्रमाणे ठेकेदारकडुन कामे करुन घ्यावी. काम दुय्यम दर्जाचे होणार नाही याची दक्षता घ्यावी. ज्या शाळांचे कामे कराल त्या चांगल्या होतील असे पहावे. एखाद्या शाळेला मोठा निधी लागणार असेल किंवा दुरुस्ती होण्याआधी नसेल तर PWD चा रिपोर्ट घेवुन तेथे नविन वर्ग खोल्या बांधण्याचे प्रपोजल करा. मुख्याध्यापकांनी सांगीतले की, या शाळा सेमी इंग्लिश केल्या तरच पटसंख्या वाढेल. काही एरियामध्ये प्रायव्हेट शाळांमुळे गरज नाही. पण तेथे गरजच आहे. त्या शाळा सेमी इंग्लिश कराव्या. या वर्षात किमान 2 ते 3 शा्ळा सेमि इंग्लिश करता आल्या तरी फरक पडेल. या सर्व गोष्टी कराव्या म्हणजे कळेल कुठल्या शाळेची रिपेअर्सची मागणी आहे. याचे नियोजन येत्या 8 ते 10 दिवसात करावे. पुढची कामे करता येतील. जे टेंडर झाले आहे तेथे डागडुजी करुन भागणारी कामे मात्र लगेच सुरु करावी. नविन शैक्षणीक वर्ष चालु होतांना ही कामे होवुन जातील. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४४२ दिनांक ०६/०५/२०२५**

धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठरावानुसार मान्यता मिळाली असून तसेच मा. जिल्हाधिकारी सो. यांची प्रशासकीय मान्यता क्र. दि. १९/०९/२०२४ रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु. २७,८८,५५१/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./वि.वि./३२५ दि. १२/०२/२०२५ अन्वये व दि. १३/०२/२०२५ च्या दै. पुण्यनगरी व दै. खान्देश खबर धुळे व धुळे महानगपालिका / महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.mahatender.gov.in वर खुल्या ई-निविदा /कोटेशन प्रसिद्ध करणेत येवून दि.१४/०२/२०२५ रोजी निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दर | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे. युनिवर्सल कम्युनिकेशन , नाशिक | २७,४९,१२३.४५/- | -५ % दराने | L1 |
| २ | मे. चैतन्य टेलीकॉम, धुळे | २७,८५२०४.७३/- | -०.१२ % दराने | |

ठेकेदार मे. युनिवर्सल कम्युनिकेशन , नाशिक यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु. २७,४९,१२३.४५/- इतक्या रकमेची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा -५ % ने कमी आहे. सदर निविदा धारकांचे निविदा दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा. आयुक्त यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

सदर कामी निविदेत ठेकेदार मे. युनिवर्सल कम्युनिकेशन , नाशिक यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे. युनिवर्सल कम्युनिकेशन, नाशिक यांनी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा -५% ने कमी आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, धुळे महानगरपालिका अंतर्गत १ ते २० महानगरपालिका शाळा व हायस्कूल परिसरात **C.C.T.V** कॅमेरे बसविणेकामी मे. युनिवर्सल कम्युनिकेशन , नाशिक यांचे -5% कमी या दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४६५ महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आगामी जयंतीच्या पार्श्वभूमीवर जेल रोडवरील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे कलरिंग करणे व दुरुस्ती करणे कामास झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४४३ दिनांक ०६/०५/२०२५**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लवकरच भीमजयंती उत्सव – २०२५ हा येत आहे. सदर भीम जयंती उत्सवाला हजारोंच्या संख्येने भीम अनुयायी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्यासाठी जेल रोडवरील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयाजवळ जमत असतो. सदर बाब लक्षात घेता १४ एप्रिल २०२५ रोजी येणाऱ्या भीम जयंतीच्या उत्सवात येणारे रथ , वाहने व होणारे विविध कार्यक्रम प्रचंड समुदाय जमत असतो. त्यामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवानिमित्त त्यांना मानवंदना म्हणून पूर्णाकृती पुतळ्याचे कलरिंग करणे व दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे.तरी सदर भागात समक्ष पहाणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकिय खर्च रु.२,२५,५३४/- मात्र आलेला आहे.

तरी उक्त काम हे जयंतीच्या अगोदर होणे आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा मे.योगेश स्वयं रोजगार संस्था., धुळे यांचे कडून करून घेणेस सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (३) (क) अन्वये त्वरित काम करण्यास व ५(२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.२,२५,५३४/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे कलरिंग करणे व दुरुस्ती करणे कामास झालेला खर्च रु.२,२५,५३४/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) प्रमाणे कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४६६ नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत मोतीनाला येथे पूल बांधणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यता देणेबाबत कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता नागरी दलित वस्ती सुधार योजना सन 2024-25 अंतर्गत मोतीनाला येथे पुल बांधणेबाबत कामास म. जिल्हाधिकारी यांनी उक्त खर्चास रक्कम रु.99,53,585/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिली होती. निविदा मागविण्यात येवुन त्यात 3 निविदा धारकांनी भाग घेतला होता. त्यात सर्वात कमी दराची निविदा मे.सी.बी.सुर्यवंशी यांची आली आहे. दरास मंजुरीसाठी मे. स्थायी समिती पुढे सादर करण्यात आले आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक काम दुय्यम दर्जाचे होणार नाही याची दक्षता याबाबत मी स्वत: पाहणी करेल या कामाबाबत कुणाचीही तक्रार आली तर बिल अदा केले जाणार नाही.सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४४४ दिनांक ०६/०५/२०२५**

नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत मोतीनाला येथे पूल बांधणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं.७४ दि.२६/०९/२०२४ म.जिल्हाधिकारी सो.,धुळे यांचे पत्र क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/ बांध/१०८९/२०२४-२५ दि.११/१०/२०२४ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ९९,५३,५८५/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./३२४/२०२४ दि.२७/०९/२०२४ अन्वये रक्कम रु. ९९,५३,५८५/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./७३/२०२४ अन्वये दि.११/१०/२०२४ अन्वये दि.१२/१०/२०२४ रोजी दैनिक पुण्यनगरी/मर्डर या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२४/१०/२०२४ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. ऋषभ राजेंद्र पाटील | शे.११.९९ % जास्तीने | |
| २ | मे. सी.बी.सूर्यवंशी | शे.१३.९९ % कमीने | सर्वात कमी दर |
| ३ | मे. आदर्श कन्सट्रक्शन | शे.९.९९ % कमीने | |

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.सी.बी.सूर्यवंशी यांचे दर शे.१३.९९ % कमी दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.सी.बी.सूर्यवंशी यांची शे.१३.९९ % कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत मोतीनाला येथे पूल बांधणेकामी श्री/मे.सी.बी.सूर्यवंशी यांचे दर शे.१३.९९ % कमी दरास मान्यता देणेत येत आहे.

सदरचे काम दर्जेदार व गुणवत्तापुर्वक व्हावे यासाठी विभागाने दक्षता घ्यावी. कामाचे महत्व लक्षात घेता कामाबाबत नागरीकांच्या तक्रारी येणार नाहीत याबाबतही दक्षता घ्यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४६७ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.४ मध्ये रमाबाई आंबेडकर नगर भागात बंदिस्त गटार करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यता देणेबाबत कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता साहित्य रत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्र.क्र. 4 मध्ये रमाबाई आंबेडकर नगर भागात बंदिस्त गटार करणेकामी मा. जिल्हाधिकारी सो. यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. 29,88,961/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यानुसार निविदा मागवण्यिात येवुन त्यात सहा निविदाधारकांनी भाग घेतला होता. त्यापैकी 2 निविदा धारकांची निविदा अंदाजपत्रकीय दराने आली होती. दोन्ही निविदाधारकांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मे. भैरव बिल्डकॉन यांची शे. 0.99 टकके कमीने काम करण्यास तयार आहे. त्यानुसार दरास मंजुरीसाठी मे. स्थायी समिती पुढे सादर करण्यात आले आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४४५ दिनांक ०६/०५/२०२५**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.४ मध्ये रमाबाई आंबेडकर नगर भागात बंदिस्त गटार करणे बाबतच्या कामास म.जिल्हाधिकारी सो.,धुळे यांचे पत्र क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/१०८९/२०२४-२५ दि.११/१०/२०२४ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. २९,८८,९६१/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./३२९/२०२४ दि.२७/०९/२०२४ अन्वये रक्कम रु. २९,८८,९६१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./१३/२०२५ अन्वये दि.११/१०/२०२४ अन्वये दि.१२/१०/२०२४ रोजी दैनिक पुण्यनगरी/मर्डर या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२३/१०/२०२४ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. ए.के.सैफी | शे.१ % जास्तीने | |
| २ | मे. गायत्री कन्सट्रक्शन | शे.३ % जास्तीने | |
| ३ | मे. भैरव बिल्डकॉन | अंदाजपत्रकीय दराने | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | मे.सौरभ संजय कदमबांडे | शे.२ % जास्तीने | |
| ५ | मे. एकविरा कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |
| ६ | मे.रामेश्वर ट्रेडर्स | शे.४ % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/मे.भैरव बिल्डकॉन/मे. एकविरा कन्सट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे रु. २९,८८,९६०/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रक दराने आहे.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.भैरव बिल्डकॉन/मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रक दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. तरी मे.एकविरा कन्सट्रक्शन यांनी दि.२५/०३/२०२५ रोजी दिलेल्या पत्रात अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने काम करू शकत नाही. सदरचे काम मे.भैरव बिल्डकॉन यांनी दर वाटाघाटी अंती त्यांनी दि.२५/०३/२०२५ रोजी दिलेल्या पत्रात शे०.९९% कमी दराने काम करण्यास तयारी दर्शविलेली आहे.त्यानुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.४ मध्ये रमाबाई आंबेडकर नगर भागात बंदिस्त गटार करणेकामी मे.भैरव बिल्डकॉन यांच्या शे०.९९% कमी दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४६८ तापी पाणी पुरवठा योजनेच्या बाभळे पा.पु केंद्रा वरील करीता **३५०** एच.पी.व्ही.टी पंप सेट क्र.**५** दुरूस्ती करणे बाबत झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालवर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता तापी पाणी पुरवठा योजनेच्या बाभळे पाणी पुरवठा केंद्रावर 6 पैकी 5 पंप कार्यान्वित आहे. दि.21/02/2025 रोजी एक पंप बेअरींग मध्ये घसारा झाल्याने नादुरुस्त झाला आहे. सदर काम तातडीने करण्यात आले. आता तेथे 2 पंप स्टॅण्डबाय आहे. आणि 3 नवे पंप आहेत. कार्योत्तर मंजुरी होण्यास मान्यतेस सादर. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४४६ दिनांक ०६/०५/२०२५**

धुळे महानगरपालिकेच्या तापी पाणी पुरवठा योजनेच्या बाभळे पाणी पुरवठा केंद्रावर ३५० एच.पी क्षमतेचे ६ पैकी ५ पंप कार्यान्वीत आहे. यापैकी दि.२१/०२/२०२५ रोजी पंप सेट क्र.५ नादुरूस्त झाले असुन सदर पंपाच्या बियरींग मध्ये घसारा झाल्याने बिघाड होऊन पंप सेट बंद पडला आहे.

बाभळे पाणी पुरवठा केंद्रावर सदर पंपसेट च्या ३५० एच.पी मोटर च्या ड्रायव्हींग व नॉन ड्रायव्हिंग च्या बियरींग मध्ये घसारा झाल्याने सदरील पंप ब्लॉक झाला. सदरील मोटर ही तातडीने खोलण्यात येवून मोटर्सचे दोन्ही बियरींग डिस्चार्ज हेड इ.खोलणेत आले. सदरील बियरींग क्र. N३२४ व QJ३२० मात्र बदलणे आले आहे. करीता सदरील मोटर डिस्टमेंन्टल करणे दोन्ही बेअरिंग एसेम्बली खोलने व व पुर्ण ग्रीसिंगसह बेअरीग टाकण्याचे काम

मे.मोहिनीराज इलेक्ट्रीकल्स यांच्याकडुन करण्यात आला आहे. उक्त कामा करीता खर्च रक्कम रू.२,२८,५३४/- आहे.

सन २०२४ -२५ चे अर्थसंकल्पानुसार पाणी पुरवठा केंद्राच्या दुरूस्ती काम करीता २ कोटी मात्र तरतुद उपलब्ध आहे. या तरतुदी अंतर्गत वरील प्रमाणे काम तातडीचे असल्याने सदरचे काम मे. मोहिनीराज इलेक्ट्रीकल्स यांचे दर व खर्चा प्रामणे रक्कम रू. २,२८,५३४ /- मात्र करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 67 (3) अन्वये कार्यात्तर मंजुरी होण्यास मान्यतेस सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, तापी पाणी पुरवठा योजनेच्या बाभळे पा.पु केंद्रा वरील करीता **३५०** एच.पी.व्ही.टी पंप सेट क्र.**५** दुरूस्ती करणे बाबत झालेला खर्च रू.२,२८,५३४/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्यात्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४६९ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र ०८ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल गार्डन (टॉवर गार्डन) परिसर विकास करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यता देणेबाबत कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) सन 2024-25 अंतर्गत सदर कामासा प्र.मा. मिळाली आहे. त्यानुसार निविदा मागविण्यात येवुन त्यात 3 निविदा धारकांनी भाग घेतला होता. त्यात वर्षा कन्स्ट्रक्शन यांची शे. 0.01 टक्के कमीने निविदा आली आहे. दरास मान्यतस्तव सादर. यात शौचालय बांधणी व क्युबीकल्स करणार आहोत. मा. आमदार महोदयांनी पाहणी केली होती. त्यानुसार सदरचे अंदाजपत्रक तयार केले होते. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४४७ दिनांक ०६/०५/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र ०८ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल गार्डन (टॉवर गार्डन) परिसर विकास करणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/१०५३/२०२४-२५ दि.०७/१०/२०२४ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ७४,९९,५९९/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./३६३/२०२४ दि.२७/०९/२०२४अन्वये रक्कम रु. ७४,९९,५९९/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./५९०/२०२४ अन्वये दि.०७/१०/२०२४ रोजी दैनिक हिंदुस्थान टाईम्स /लोकमत या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०५/११/२०२४ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.वर्षा कन्सट्रक्शन कंपनी | शे.०.०१% कमीने | सर्वात कमी दर |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | मे. एकविरा कन्सट्रक्शन | शे. २ % जास्तीने | |
| ३ | मे.रामेश्वर ट्रेडर्स | शे. ३ % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.वर्षा कन्सट्रक्शन कंपनी यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ७४,९८,८४९/- इतक्या रक्कमेचे असून शे.०.०१% कमी दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.वर्षा कन्सट्रक्शन कंपनी यांचे दर शे.०.०१% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.वर्षा कन्सट्रक्शन कंपनी यांची शे.०.०१% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र ०८ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल गार्डन (टॉवर गार्डन) परिसर विकास करणेकामी मे.वर्षा कन्सट्रक्शन कंपनी यांच्या दर शे.०.०१% कमी दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४७० महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र ०३ मध्ये त्रिदेव हॉटेल ते श्री.निनाद पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी आलेल्या निविदा दरास मान्यता देणेबाबत कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) सन 2024-25 अंतर्गत सदरचे काम मंजुर होते. ईनिविदा मागविण्यात येवुन त्यात सर्वात कमी दराची निविदा एकविरा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने प्राप्त झाली आहे. त्यानुसार दरास मंजुरीसाठी मे. स्थायी समिती पुढे सादर करण्यात आले आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४४८ दिनांक ०६/०५/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र ०३ मध्ये त्रिदेव हॉटेल ते श्री.निनाद पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/१०५३/२०२४-२५ दि.०७/१०/२०२४ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. २९,९८,९५०/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४००/२०२४ दि.२७/०९/२०२४अन्वये रक्कम रु. २९,९८,९५०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./५९०/२०२४ अन्वये दि.०७/१०/२०२४ रोजी दैनिक हिंदुस्थान टाईम्स /लोकमत या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०६/११/२०२४ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | अंदाजपत्रक दर | सर्वात कमी दर |
| २ | मे. गायत्री कन्सट्रक्शन | शे. ३.०० % जास्तीने | |
| ३ | मे. रामेश्वर ट्रेडर्स | शे. ४.०० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे २९,९८,९५०/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दरअंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल विचारात घेता, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र ०३ मध्ये त्रिदेव हॉटेल ते श्री.निनाद पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी मे.एकविरा कन्सट्रक्शन यांच्या अंदाजपत्रक दराने आलेले निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४७१ धुळे मनपा नवीन इमारत येथील उद्वाहक (लिफ्ट) च्या देखभाल दुरुस्तीसाठी तीन वर्षाकरिता AMC नेमणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४४९ दिनांक ०६/०५/२०२५**

धुळे मनपा नवीन इमारत येथे सद्यास्थितीत दोन उद्वाहक यंत्र बसविण्यात आले आहे.सदर काम हे मे.बडगुजर कंपनी,नाशिक यांनी कार्यादेश क्र.विवि.२०.दि.२६-१०-२०१८ नुसार काम पूर्ण केले आहे.उक्त कार्यादेशीत कामाचा देखभाल दुरुस्ती करावयचा कालावधी तीन वर्ष होता.त्यानुसार सदर कामाचा देखभाल दुरुस्तीचा कालावधी दि.२१-०५-२०२२ रोजी समाप्त झाला असून,मक्तेदाराने तसे पत्र दिले होते.तरीही संबंधित उद्वाहक कंपनी OTIS यांचे तांत्रिक कर्मचारी हे वेळोवेळी दोनही लिफ्ट ची देखभाल दुरुस्ती करत होते.दोनही लिफ्ट चा वापर अधिकारी,कर्मचारी,वयस्कर व्यक्ती,अपंग व्यक्ती,नागरिक कायम करत असतात.व लिफ्ट कार्यालयीन वेळेत पूर्ण वेळ वापरात असते.त्यानुसार सदर लिफ्ट ची देखभाल दुरुस्तीसाठीचा तीन वर्षाकरिता कार्यादेश देण्यात आलेला होता.परंतु सदर कार्यादेशाची मुदत संपुष्टात आलेली आहे.

त्यामुळे दोनही उद्वाहक यंत्र (लिफ्ट) ची वेळेवर देखभाल दुरुस्ती होणे गरजेचे आहे.यामध्ये मशीन,कंट्रोलर,शाफ्ट,ब्याटरी,लिफ्ट मधील लाईट,दरवाजे ई.ची देखभाल करावी लागणार आहे.वार्षिक देखभाल दुरुस्ती (AMC) करिता मे.ओटीस लि.मुंबई यांनी दरपत्रक दिले आहे.त्यानुसार त्यांनी प्रति वर्ष करिता खालीलप्रमाणे दरपत्रक दिले असुन,मक्तेदार यांचे तीन वर्ष मुदतीनंतर हि ओटीस कंपनी कडून वेळोवेळी visit व तपासणी/दुरुस्ती करणेत येते.

| ContraCt no. | No. of lift | BasiC annual priCe | GST | Total | Lift AMC period |
|---|---|---|---|---|---|
| MA७१९८ | २ | १,२१,०००/- | २१७८०/- | १,४२,७८०/- | १st oCt २०२४ to ३0th sept २०२५ |
| MA७१९८ | २ | १,३३,०००/- | २३९४०/- | १,५६,९४०/- | १st oCt २०२५ to ३0th sept २०२६ |
| MA७१९८ | २ | १,४५,०००/- | २६१००/- | १,७१,१००/- | १st oCt २०२६ to ३0th sept २०२७. |
| | | | Total | ४,७०,८२०/- | |

करिता उक्तप्रमाणे दोनही लिफ्ट (उद्वाहक)चा वार्षिक देखभाल दुरुस्ती तीन वर्षाकरिता AMC करणे करिता ओटीस कंपनी यांना उक्त दराप्रमाणे दर करार करणे करिता व कार्यादेश देणेस सदर विषय मे.स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर करणेत आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, धुळे मनपा नवीन इमारत येथील उद्वाहक (लिफ्ट) च्या देखभाल दुरुस्तीसाठी तीन वर्षाकरिता मे.ओटीस लि.मुंबई यांनी रक्कम रु. ४,७०,८२०/- मात्र सादर केलेल्या दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४७२ धुळे महानगरपालिकेच्या वरखेडी रोडवरील असलेल्या गांडुळ खत प्रकल्पाच्या जागेवर बांबु लागवडसाठी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्या. अधिक्षक (वृक्ष) महाराष्ट्र राज्य प्रधान सचिव वने विभाग यांनी महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांना बांबु लागवडीचे उददीष्ट दिले होते. तसेच जिल्हाधिकारी सो. यांनी देखील उददीष्ट दिले होते. ते आपण 100 टक्के पुर्ण केले आहे.गांडुळखत प्रकल्पाजवळ चौफेर बांबु लागवड केली आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यावर्षी रोप देणार आहेत का ते.

मा.कार्या. अधिक्षक (वृक्ष) हो त्यांना एक लाख रोपांची मागणी पत्र दिले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४५० दिनांक ०६/०५/२०२५**

धुळे महानगरपालिका सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात बांबु लागवडीचे उद्दिष्ट पुर्ण करणेकरीता वरखेडी रोडवरील गांडुळ खत प्रकल्पाजवळील एक एकर जागेवर मियावाकी पध्दतीने रोपांची लागवड केलेली आहे. त्याच्या चौफेर जागेत बांबु लागवड करणे आवश्यक असल्याने तसेच मियावाकी पध्दतीने लागवड केलेल्या रोपांपैकी २५ ते ३० टक्के रोपे जिवंत नसल्याने ते नविन लावणेबाबतचे आदेश दिले गेले होते. त्यानुसार किसान रोपवाटीका, भडगांव यांना हे काम देण्यात आले होते. सदर कामाचे बिल त्यांनी सर्व खर्चासह रुपये १,३७,७००/- जीएसटी सह सादर केलेले आहे.

तसेच सदरचे काम तातडीने असल्याचे संचालक अनुष्का मर्ल्टीसर्व्हिसेस यांचा मागील अनुभव पाहता त्यांचेकडून करुन घेण्यात आलेले आहे. व सदर प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, धुळे महानगरपालिकेच्या वरखेडी रोडवरील असलेल्या गांडुळ खत प्रकल्पाच्या जागेवर बांबु लागवडसाठी झालेला खर्च रुपये १,३७,७००/- जीएसटी सह मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्यात्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४७३ धुळे महानगरपालिकेच्या वरखेडी रोडवरील असलेल्या गांडुळ खत प्रकल्पाच्या जागेवर ठिबक सिंचनसाठी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्या. अधिक्षक (वृक्ष) यासाठी ठिबक सिंचन केले होते. 20 टक्के रोप जगली आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४५१ दिनांक ०६/०५/२०२५**

धुळे महानगरपालिका सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात वरखेडी रोडवरील गांडुळ खत प्रकल्पाजवळील एक एकर जागेवर मियावाकी पध्दतीने रोपांची लागवड केलेली आहे. मियावाकी पध्दतीने लागवड केलेल्या रोपांपैकी सर्वच रोपे जगणे आवश्यक आहे. रोपे जगण्यासाठी त्यांना नियमित पाणीपुरवठा आवश्यक आहे. त्यामुळे सदर जागेवर ठिबक सिंचन करण्याबाबतचे आदेश दिले गेले होते. त्यानुसार कृषीराज ॲग्रो एजन्सी यांना हे काम देण्यात आले होते. सदर कामाचे बिल त्यांनी सर्व खर्चासह रक्कम रुपये १४९९२३/- जीएसटी व इतर करांसह सादर केलेले आहे.

तसेच सदरचे काम तातडीने असल्याचे संचालक कृषीराज ॲग्रो एजन्सी यांचा मागील अनुभव पाहता काम करुन घेणेत आलेले आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव मे. स्थायी समितपुढे कार्योत्तर मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता,धुळे महानगरपालिकेच्या वरखेडी रोडवरील असलेल्या गांडुळ खत प्रकल्पाच्या जागेवर ठिबक सिंचनसाठी झालेला खर्च रक्कम रुपये १४९९२३/- जीएसटी व इतर करांसह मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्यात्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४७४ माहे मार्च-2025 Breeding Checkers यांचे कामासाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता या ब्रिडींग चेकर्सची आवश्यकता आहे का?

मा.मले. पर्यवेक्षक आता त्यांचे काम बंद केले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४५२ दिनांक ०६/०५/२०२५**

धुळे महानगरपालिका क्षेत्रात परिसर स्वच्छतेचा अभाव पावसाळ्यात साचलेले पाणी यामुळे चिकनगुनिया आणि डेंग्यु, मलेरीया सारख्या साथरोगांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने वाढणाऱ्या एडीस डासांच्या उत्पत्तीवर नियंत्रण मिळणे करीता प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक आहे. व त्याकरीता मलेरीया विभागाकडे पुरेशे मनुष्यबळ उपलब्ध नसल्या कारणाने शासन निर्णयानुसार पारेषण काळात २८ Breeding Checkers उपलब्ध करुन घेणेकामी राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाच्या अर्थसंकल्पात दोन महिने कालावधी करीता निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता व शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार २८ Breeding Checkers यांची निवड करण्यात आली आहे.

उक्त २८ Breeding Checkers यांचे माहे मार्च मधील २५ दिवसांचे रु.४५०/- प्रति दिवस प्रमाणे एकुण रक्कम रु.३,०३,७५०/- (तीन लक्ष तीन हजार सातशे पन्नास मात्र ) वेतन होत आहे. उक्त खर्चासाठी धुळे महानगरपालिकेच्या सन २०२५-२६ च्या वार्षिक अंदाजपत्रकात १,५०,००,०००/- रुपयांची तरतुद दर्शवीली आहे. तरी उक्त रक्कमेतुन रु.३,०३,७५०/- खर्चास कार्योत्तर मान्यता मिळुन प्रशासकीय मान्यतेस्तव मे.स्थायी समितीसमोर सादर करण्यास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, माहे मार्च-२०२५ Breeding Checkers यांचे कामासाठी झालेला खर्च रुपये रक्कम ३,०३,७५०/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्यात्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४७५ धुळे महानगरपालिका मालमत्ता कराची थकबाकी खटला बाबत राष्ट्रीय लोकअदालत आयोजनकरीता आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४५३ दिनांक ०६/०५/२०२५**

सचिव, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण,धुळे महानगरपालिका मालमत्ता कराची थकबाकी खटला बाबत राष्ट्रीय लोक अदालत आयोजन करण्यात आलेले आहे. खटला पूर्व प्रकरणांचे दिनांक २८/०९/२०२४ रोजी राष्ट्रीय अदालतचे धुळे जिल्हा न्यायालय येथे आयोजन केले आहे.

सदरचे काम तातडीचे असल्याने सदरच्या कामाबाबत धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स ॲण्ड केटरर्स,धुळे त्यांच्याकडुन सदरचे काम करुन घेण्यात आलेले आहे.त्याअन्वये सदरच्या सेवाधारकां कडील बिलाप्रमाणे खर्च रुपये ५७,७०२/- जीएसटी सह सादर झालेला आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, धुळे महानगरपालिका मालमत्ता कराची थकबाकी खटला बाबत राष्ट्रीय लोकअदालत आयोजनकरीता झालेला खर्च रुपये ५७,७०२/- जीएसटी सह मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्यात्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४७६ धुळे म.न.पा हद्दीतील होर्डींगचे Structural Audit करण्यात आलेल्या खर्चास (फी) कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४५४ दिनांक ०६/०५/२०२५**

धुळे महानगर पालिका हद्दीतील जाहिरात फलक लावणेत आलेले आहेत सदर शासनाचे प्राप्त पत्रानुसार दि.१३/०५/२०२४ रोजी अवकाळी व वादळी वाऱ्यासह आलेला पावसामुळे मुंबई येथील घाटकोपर वडाळा येथे होर्डींग पडल्यामुळे मोठ्या प्रमाणात निरपधार व्यक्तीच्या मृत्यु झाल्यामुळे शहरातील अनधिकृत होर्डींग काढणेसाठी कार्यवाही करणेत येत आहे.

तसेच शहरात लागलेले उर्वरीत होर्डिंग संदर्भात Structural Audit करणे करीता मा.आयुक्त सो यांचे कडेस टिपणी सादर करणेत आलेली असता दि.१८/०७/२०२४ रोजी मान्यता मिळालेली असुन त्यामध्ये शहरातील श्री.सुनिल मुंदडा B.E.(Civil) M.tech. यांना नियुक्ती पत्र जाहिरात जा.क्र.४९ दि.२२/७/२०२४ ने देण्यात आलेले आहे.

त्यानुसार संबंधीत होर्डींग धारक यांनी त्यांचे कडील एजन्सी मार्फत Structural Audit धुळे म.न.पा. कडेस सादर करणेत आलेले असता सदरचे सादर केलेले Structural Audit यांची आपले नियुक्त केलेल्या Structural Audit Engineer यांचे कडुन तपासणी करुन घेण्यात आलेली आहे.

तरी संबंधीत Structural Auditor यांनी तपासणी अहवाल सादर केलेला असुन त्याबाबतचे बिल एकूण रुपये २,७६,०००/- सर्व करांसहीत सादर केलेले आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, धुळे म.न.पा हद्दीतील होर्डींगचे Structural Audit करण्यासाठी झालेला खर्च एकूण रुपये २,७६,०००/- सर्व करांसहीत मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्यात्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४७७ धुळे शहर पाणी पुरवठा केंद्र येथील देखभाल दुरूस्ती कामांसाठी व्दि वार्षीक निविदा दराना मंजुरी देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता दरवर्षी आपण वार्षिक निविदा करतो. मागील निविदेची मुदत संपलेली होती. मागील वर्षी सुध्दा रु. 38,00,966/- एवढयाच रक्कमेची निविदा काढली होती. त्याच दराने ही निविदा केली आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४५५ दिनांक ०६/०५/२०२५**

मा.आयुक्त, सो. यांचे टिपणी मंजुरी दि.०६/०३/२०२५ अन्वये अंदाजपत्रकिय रक्कम रू.३८,००,९६६/- करीता (प्रती वर्ष) खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत ई-निविदा सुचना क्र.१५५ /पा.पु/१०३ दि.१८/०३/२०२५ नुसार निविदा सुचना प्रसिध्द करून नोंदणीकृत मक्तेदाराकडुन निविदा दर मागविण्यात आले असुन तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | दर प्रती वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | मे. बिजासनी इंन्टप्राईजेस,धुळे | ७६०१९२४.५८ | ३८००९६६/- | L१ |
| 2 | मे.ओम श्री मंगलमुर्ती इलेक्ट्रीकल्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर,नाशिक | ८३७५०५२.०० | ४१८७५२६/- | L२ |
| 3 | मे.पंडित इलेक्ट्रीकल्स,धुळे | ९३४७९८१.८० | ४६७३९९०/- | L३ |

वरील प्रमाणे प्राप्त दरात मे. बिजासनी इंन्टप्राईजेस, यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु. ३८,००,९६६/- इतक्या रकमेची प्रती वर्ष आयटम रेट दरा प्रमाणे असुन ती अंदाजपत्रकीय दराची आहे. सदर निविदा धारकांचे निविदा दर हे अंदाजपत्रकीय दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा. आयुक्त यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

करिता सदर कामी निविदेत ठेकेदार मे. बिजासनी इंन्टप्राईजेस,धुळे यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे. बिजासनी इंन्टप्राईजेस,धुळे यांनी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची आलेले निविदा दर प्रती वर्ष आयटम रेट दरा प्रमाणे मंजुरी होऊन धुळे शहर पाणी पुरवठा केंद्र येथील देखभाल दुरूस्ती कामांसाठी व्दि वार्षीक निविदा दराना २ वर्ष मुदती करीता करार करणे साठी व उक्त कामाचे कार्यादेश होणेसाठी सदर प्रस्ताव मान्यतेस सादर मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, धुळे शहर पाणी पुरवठा केंद्र येथील देखभाल दुरूस्ती कामांसाठी दोन वर्ष मुदती करीता मे बिजासनी इंन्टप्राईजेस,धुळे यांच्या प्रतिवर्ष रुपये ३८,००,९६६/- मात्र निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४७८ तापी पा.पु योजना मुख्य जलवाहिनी वरील एम.बी.आर ते सुखवद पा.पु केंद्र दरम्यान लिकेंजेस दुरूस्ती करणे तसेच मुख्य जलवाहिनी वरील व जलशुध्दीकरण केंद्रातील व्हॉल दुरूस्ती करणे तसेच बाभळे व अन्य जलशुध्दीकरण केंद्रावरील क्लरिफयॅक्युलेटर मधील गाळ काढणे व तापी पाणी पुरवठा योजने करीता वाहन पुरवठा करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता या निविदेत आपण फिल्टर प्लांटच्या ज्या दुरुस्त्या आहे. त्यामध्ये व्हॉल्व दुरुस्ती, मिटर दुरुस्ती आणि एचडी पॅनेल ॲड केले आहे. यापुर्वी छोटा हत्ती हे वाहन वापरत होतो, आता बोलेरो रेंटने वापरतोय.

मा.आयुक्त तथा प्रशासक रेंट ने घ्या किंवा खरेदी करुन टाका देखभाल दुरुस्तीसाठी एक व्हॅन आवश्यक आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४५६ दिनांक ०६/०५/२०२५**

मा.आयुक्त, सो. यांचे टिपणी मंजुरी दि.०६/०३/२०२५ अन्वये अंदाजपत्रकिय रक्कम रू.१,४७,३१,८८८/- करीता (प्रती वर्ष) खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत ई-निविदा सुचना क्र.१५५ /पा.पु/१०३ दि.१८/०३/२०२५ नुसार निविदा सुचना प्रसिध्द करून नोंदणीकृत मक्तेदाराकडुन निविदा दर मागविण्यात आले असुन तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. बिजासनी इंन्टप्राईजेस,धुळे | १,४७,६७,००६/- | L1 |
| २ | मे.पंडित इलेक्ट्रीकल्स,धुळे | १,६२,२७,१०७/- | L2 |
| ३ | मे.ओम श्री मंगलमुर्ती इलेक्ट्रीकल्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर,नाशिक | १,६२,८५,४२१/- | L3 |

वरील प्रमाणे प्राप्त दरात मे. बिजासनी इंन्टप्राईजेस,धुळे यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु.१,४७,६७,००६/- इतक्या रकमेची प्रती वर्ष आयटम रेट दरा प्रमाणे असुन ती अंदाजपत्रकीय दराची आहे. सदर निविदा धारकांचे निविदा दर हे अंदाजपत्रकीय दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा. आयुक्त यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

करिता सदर कामी निविदेत ठेकेदार मे. बिजासनी इंन्टप्राईजेस,धुळे यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे. बिजासनी इंन्टप्राईजेस,धुळे यांनी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकिय दराना ०.२% जास्त आलेले निविदा दर प्रती वर्ष आयटम रेट दरा प्रमाणे L-1 आहेत.

करीता तापी पा.पु योजना मुख्य जलवाहिनी वरील एम.बी.आर ते सुखवद पा.पु केंद्र दरम्यान लिकेंजेस दुरूस्ती करणे तसेच मुख्य जलवाहिनी वरील व जलशुध्दीकरण केंद्रातील व्हॉल दुरूस्ती करणे.तसेच बाभळे व अन्य जलशुध्दीकरण केंद्रावरील क्लरिफयॅक्युलेटर मधील गाळ काढणे व तापी पाणी पुरवठा योजने करीता वाहन पुरवठा करणे आयटम रेट दरांना २ वर्ष मुदती करीता करार करणे साठी मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, तापी पा.पु योजना मुख्य जलवाहिनी वरील एम.बी.आर ते सुखवद पा.पु केंद्र दरम्यान लिकेंजेस दुरूस्ती करणे तसेच मुख्य जलवाहिनी वरील व जलशुध्दीकरण केंद्रातील व्हॉल दुरूस्ती करणे तसेच बाभळे व अन्य जलशुध्दीकरण केंद्रावरील क्लरिफयॅक्युलेटर मधील गाळ काढणे व तापी पाणी पुरवठा योजने करीता वाहन पुरवठा करणेकामी दोन वर्ष मुदती करीता मे बिजासनी इंन्टप्राईजेस,धुळे यांच्या प्रतिवर्ष रुपये रु.१,४७,६७,००६/- मात्र निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४७९ धुळे महानगरपालिकेतील मानधन कर्मचारी यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४५७ दिनांक ०६/०५/२०२५**

धुळे महानगरपालिकेतील खालीलप्रमाणे कनिष्ठ अभियंता व डाटा ऐंट्री ऑपरेटर (संगणक लिपीक) यांना मानधन तत्वावर आदेशान्वये ०६ महिने कालावधी करिता मुदतवाढ देण्यात आलेली होती.

उक्त मानधनावरील कर्मचारी यांची सेवा संबंधित विभागाकरिता आवश्यक असल्याने संबंधित विभाग प्रमुख यांनी उक्त नमूद अ.क्र. १ ते ११ वरील कर्मचारी यांना मुदतवाढ देणेबाबत शिफारस केलेली आहे.

तरी संबंधित विभाग प्रमुख यांच्या विनंतीनुसार उक्त नमूद अ.क्र.१ ते ११ मानधनावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसांची सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिन्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मुदतवाढ देणेबाबतचा विषय मे. स्थायी समितीपुढे विचारार्थ ठेवणे आवश्यक आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता,प्रस्तावातील नमूद अ.क्र.१ ते ११ मानधनावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसांची सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिन्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मुदतवाढ देणेस मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४८० कंपोस्ट डेपोवर कचरा टाकण्यासाठी जागा करणेकामी भाड्याने पोकलँन मशिनचे बिल अदा करण्याकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक ती साईट क्लिअर करावे. तेथे यापुढे कचरा टाकु नये. आता यापुढे मी पैसे देणार नाही त्या कामासाठी, एक महिन्यात ते क्लिअर करुन हवे. यापुढे पेकलॉण्ड व जेसीबी साठी पैसे देणार नाही. ही साईट क्लिअर करण्यासाठी पैसे एसबीएम मधील बायोमायनिंगचे राहिलेले 16 टक्के बिलो आलेले जे काम आहे त्यातले अप टु 16 टक्के खर्च हे सगळे यातुन वर्क आऊट करायचा आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४५८ दिनांक ०६/०५/२०२५**

मनपा शेत स.नं.६१/६२ कंपोस्ट डेपो हा सद्यस्थितीत पुर्ण क्षमतेने भरलेला असुन कचऱ्याची लेव्हल करणे, वाहने जाण्यास रस्ता तयार करणे गरजेचे आहे. पुढे पावसाळ्याचे दिवस सुरु होणार असुन कचरा टाकणारी वाहने डेपोवर फसत असतात तसेच वाहने पलटी होवुन नादुरुस्त होत असतात. कचरा टाकण्यास जागा पुरेशी शिल्लक नसल्याने व कचरा डेपोवर वाहनांना जाण्यास जागा नसल्याने वाहनचालक रस्त्यावर वरखेडी रोडवर इतरत्र टाकत असतात. त्यामुळे ये जा करणाऱ्या नागरीकांना व परिसरातील शेतकऱ्यांचा रस्ता बंद होत असल्याने त्याचा मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत असतो. तेथील शेतकरी व नागरीक इकडील कार्यालयात तक्रारी करीत होते. उक्त बाबत मा.आयुक्त तथा प्रशासक सो. यांच्याकडे कैफीयत मांडली असता त्यांनी उक्त काम हे तातडीने करुन घेणे बाबत निर्देश दिले होते.

सदर परिस्थितीत कंपोस्ट डेपोवर वाहने जाण्यास जागा लेव्हल करुन रस्ता तयार करणे व कचरा टाकण्यास जागा करणे गरजेचे आहे. याकामी पोकलँड मशिनची आवश्यकता होती. सदर काम हे मोठ्या प्रमाणात असल्याने जेसीबी मशिनद्वारे होवु शकत नव्हते. कचरा जास्त प्रमाणात साचलेला असल्याने व धुळे महानगरपालिकेकडे पोकलँड मशिन उपलब्ध नसल्याने तसेच सतत डेपोवर कचऱ्याचे वाढते प्रमाण पहाता माहे डिसेंबर-२०२४ ते जानेवारी-२०२५ या कालावधीत पोकलँड मशिन भाड्याने लावुन उक्त काम करुन घेणे आवश्यक होते.

त्यानुसार उक्त बाब हि तातडीची व नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने शहरातील राजछाया एंटरप्राईजेस यांच्याशी संपर्क साधुन कामाचे प्रती दिवस ८ तास नुसार एक पोकलँड मशिन भाड्याने लावुन धुळे महानगरपालिकेच्या कंपोस्ट डेपोवर कचरा टाकण्यासाठी जागा करण्यात आली, वाहने जाण्यासाठी रस्ता तयार करण्यात आला, रस्त्यावर पडलेला संपुर्ण कचरा उचलुन आत टाकण्यात आला व तत्सम कामे करुन घेण्यात आलेली आहे.

राजछाया एंटरप्राईजेस यांनी एक पोकलँड मशिन भाड्याने पुरविल्याचे (ड्रायव्हर,डिझेल व दुरुस्तीसह) रु.२८००/- (जीएसटी करासह) माहे डिसेंबर-२०२४ व जानेवारी-२०२५ या कालावधीचे बिल मागणी सादर करुन सदर संस्थेने माहे डिसेंबर-२०२४ चे एकुण २०८ तास व माहे जानेवारी-२०२५ चे २१६ तास असे एकुण तीन महिन्याचे ४२४ तास एकुण रु.११,८७,२००/- बिल मागणी केलेले आहे.

पोकलँड मशिनच्या दराबाबत पडताळणी करण्याकामी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचे स्टेट शेड्युल ऑफ रेट्स (SSR) २०२३-२४ दरसुची तपासणी केली असता त्यात पोकलँड मशिनचे भाडे प्रती तास रु.२,८६२/- दर आहे. त्यानुसार राजछाया एंटरप्राईजेस यांनी मागणी केलेले दर हे बाजारभावानुसार योग्य आहे.

सदरचे काम हे घनकचरा व्यवस्थापनाशी निगडीत असुन व अत्यावश्यक सेवेचे असल्याने तातडीने करुन घेणे गरजेचे आहे. सन २०२५-२६ च्या मुळ अंदाजपत्रकात जेसीबी / पोकलँड भाडे या लेखाशिर्षकाखाली रु.८४ लक्ष तरतुद करण्यात आली असुन सदर तरतुदी मधुन अद्याप पावेतो खर्च करण्यात आलेला नाही. तरी सदर तरतुदी मधुन उक्त कामाकरीता खर्च भागविता येवु शकतो.

त्याअनुषंगाने उक्त रक्कमेतुन रु.११,८७,२००/- खर्चास कार्योत्तर मान्यता मिळुन प्रशासकीय मान्यतेस्तव मे.स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, कंपोस्ट डेपोवर कचरा टाकण्यासाठी जागा करणेकामी भाड्याने पोकलँन मशिनचे बिल अदा करण्याकामी झालेला खर्च रक्कम रुपये ११,८७,२००/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्यात्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४८१ धुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सामुदायीक शौचालय साफसफाई, देखभाल दुरुस्तीच्या ई-निविदे संदर्भात आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक ठेकेदार आताचे काम चांगले करतोय का. लोकांच्या तक्रारी येतच आहे. फक्त मुदतवाढी द्यायच्या का. त्या कामाचे थर्ड पार्टी करुन घ्यावे. मोगलाई येथील टॉयलेटची

परिस्थिती काय आहे. कधी होणार टॉयलेट दुरुस्त्या. बंद करुन टाका रिव्हयु घ्या. त्या भागात लोकांकडे शौचालय असेल व गरज नसेल तर सार्वजनिक शौचालय बंद करावे. ठेकेदाराला बोलावुन घ्या. जेवढे युनिट आहे ते ठेवायची गरज आहे का ते पहा. सदरचा विषय तहकुब ठेवा. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४५९ दिनांक ०६/०५/२०२५**

धुळे महानगरपालिका हद्दीतील सामुदायीक शौचालय देखभाल दुरुस्ती करीता ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर ई-निविदेत प्राप्त ४ निविदाधारक पैकी श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस यांचे सर्वात न्युनतम (कमी) दर प्रती युनिट प्रती महिना रु.६,१२०/- प्राप्त झाले होते.

ठरावानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील १३५ युनीट सामुदायीक शौचालय देखभाल दुरुस्ती करीता सदर कामी श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस यांचे सर्वात न्युनतम (कमी) दर प्रती युनिट प्रती महिना रु.६,१२०/- आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. सदर संस्थेची मुदतवाढ केलेली कामाची ६ महिन्याची मुदत हि दिनांक १४/४/२०२५ रोजी संपुष्टात येत आहे.

सद्यस्थितीत श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस या संस्थेमार्फत १३५ युनिट सामुदायीक शौचालयाचे साफसफाई व देखभाल दुरुस्तीचे कामकाज सुरु आहे. तसेच धुळे शहरातील नागरीकांचा सामुदायीक शौचालयाचा वापर पहाता सदरचे काम सुरु ठेवणे आवश्यक आहे. तसेच हद्दवाढ भागात मनपा मार्फत विविध योजनेतुन नागरीकांसाठी नविन शौचालयाचे बांधकाम करण्यात आले असुन सदर शौचालय देखील सुरु करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस यांना उक्त कामाची मुदतवाढ देण्यात यावी किंवा नविन ई-निविदा प्रसिध्द करण्यात यावी याबाबत सदर प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन प्रस्ताव व सद्यस्थितीतील परिस्थिती लक्षात घेता श्री.चंद्रगणेश एंटरप्राईजेस यांच्या सुरु असलेल्या कामाचे पुनश्च वस्तुनिष्ठ मुल्यमापन व सद्यस्थितीत सार्वजनिक शौचालयांची पाहणी करुन अहवाल सादर करावा. तोपावेतो सदर प्रस्ताव तहकुब ठेवण्यास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४८२ — सन २०२४-२५ अपारंपरिक उर्जा विकास योजने अंतर्गत धुळे महानगरपालिका हद्दीतील विविध गार्डन आणि विविध चौकांमध्ये सोलर ट्री बसविणे कामी आलेल्या निविदा दरास मान्यता देणेबाबत कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — मा.आमदार महोदयांच्या पत्रानुसार व मा जिल्हाधिकारी महोदय यांच्या मान्यतेनुसार सदर प्रस्तावासाठी 3 कि.वॅ. व 5 कि.वॅ. सोलर ट्री आपण आस्थापित करणार आहोत. यामध्ये विविध ठिकाणी व पांझरा नदीकिनारी हे करणार आहोत. त्या विज निर्मीतीतुन तेथील स्ट्रीट लाईट जोडणार आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४६० दिनांक ०६/०५/२०२५**

धुळे महानगरपालिका हद्दीतील विविध गार्डन आणि विविध चौकांमध्ये सोलर ट्री बसविणे. (८ नग ) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२४-२५ अपारंपरिक उर्जा विकास योजने अंतर्गत

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठरावानुसार मान्यता मिळाली असून मा. जिल्हाधिकारी सो. यांच्याकडील प्रशासकीय मान्यता आदेश जा.क्र. जीनिस/O /२०२५/ Mar/ CombineAAO/०३४६५ दि. २५/०३/२०२५ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु. ४९,९९,७५२/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./वि.वि./३८५ दि.२७/०३/२०२५ अन्वये व दि.२८/०३/२०२५ च्या दै. दिव्यमराठी /खानदेश खबर व धुळे महानगपालिका / महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.mahatender.gov.in वर खुल्या ई-निविदा /कोटेशन प्रसिद्ध करणेत येवून दि.२८/०३/२०२५ रोजी पासून निविदा मागविणेत आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत Online पद्धतीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे.समवील पावर & इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. धुळे | अंदाजपत्रकीय दराने | L१ |
| 2 | मे.प्रगती इंजिनिअरिंग वर्क्स ,धुळे | अंदाजपत्रकीय दराच्या 4.5 % जास्तीने | |
| 3 | मे शिवानी इंटरप्रायझेस ,धुळे | अंदाजपत्रकीय दराच्या 3 % जास्तीने | |

ठेकेदार मे.समवील पावर & इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. धुळे यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु. ४९,९९,७५२/- इतक्या रकमेची असुन ती अंदाजपत्रकीय दराची आहे. सदर निविदा धारकांचे निविदा दर हे अंदाजपत्रकीय दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा. आयुक्त यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

करिता सदर कामी निविदेत ठेकेदार मे.समवील पावर & इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. धुळे यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.समवील पावर & इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. धुळे यांनी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, सन २०२४-२५ अपारंपरिक उर्जा विकास योजने अंतर्गत धुळे महानगरपालिका हद्दीतील विविध गार्डन आणि विविध चौकांमध्ये सोलर ट्री बसविणे कामी मे.समवील पावर & इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. धुळे यांच्या अंदाजपत्रकीय दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४८३ धुळे महानगरपालिका कडील स्वच्छ सर्वेक्षण 2023 करीता व आरोग्य विषयां संदर्भात विविध साहित्य व त्यावर प्रिंन्टींग तयार करुन लावण्यात आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४६१ दिनांक ०६/०५/२०२५**

मा.उपायुक्त सो यांचे दालनात झालेल्या तातडीचे बैठकीत शहरातील नागरीका मध्ये जनजागृती करणे करीता शहरातील क्षेत्रात असे अनेक ठिकाणी विविध साहित्य व त्यावर छपाई करून लावणेस सुचित करणेत आले होते.

तसेच सदर काम हे प्रिन्टींग करणे असल्याने आपले कडील शासकीय पुरवठा धारक अलका प्रिन्टर्स हे डिलीटल बॅनर प्रिन्टींग चे काम करीत असता त्यांचे कडेस इतर साहित्याचा बाजार दर तपासुन त्यांचे बाजार दर इतरांपेक्षा कमी असल्याने सदरचे काम तातडीचे असल्याने त्यांचे कडुन करून घेण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे संबधीत कामाच्या सुचनेनुसार शहरात निर्देशीत केलेल्या ठिकाणी नियोजित वेळेत काम पुर्ण केलेले आहे. त्यानुसार अनुक्रमे अलका प्रिन्टर्स धुळे यांनी प्रस्तावात नमूद एकूण 1 ते 42 कामांसाठी मंजूर दरानुसार झालेला खर्च रुपये **४,७४,३३७/-** मात्र मागणी केली आहे.त्यानुसार सदर प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, धुळे महानगरपालिका कडील स्वच्छ सर्वेक्षण 2024 करीता व आरोग्य विषयां संदर्भात विविध साहित्य व त्यावर प्रिंन्टींग तयार करुन लावण्यात आलेल्या कामासाठी झालेला खर्च रुपये **४,७४,३३७/-** GST सह मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**